# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी : २२६२०६८५, २२६५०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स : २२६२११०२/२२६१०००७.

EDUTECH E-mail : desk11@dte.org.in Internet :http/www.dte.org.in


क्र.३/अ.सं/तंशिस/२००९/०३८
दिनांकः- १६/०२/२०१०

प्रति,

सहसंचालक तंत्र शिक्षण,
विभागीय कार्यालय,
मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर, औरंगाबाद, अमरावती.

विषयः- अल्पसंख्यांक शिष्यवृत्तीची अंमलबजावणी

महाराष्ट्र शासनाच्या अल्पसंख्यांक विकास विभागातर्फे मुस्लिम, जैन, शिख, ख्रिश्चन, बौध्द, पारशी या समुदायाच्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्तीची योजना लागू करण्यात आलेली आहे. सदर शिष्यवृत्ती योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी प्रत्येक संस्थेमध्ये एका प्राध्यापकाची नेमणुक करण्याचे आदेश आपल्या स्तरावरुन देण्यात यावे. सदर प्राध्यापकावर खालील जबाबदारी निश्चित करण्यात यावी.

१. प्रत्येक वर्गामधील वरील अल्पसंख्यांक समुदायाच्या पात्र विद्यार्थ्यांची यादी तयार करणे.
२. पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरण्यासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व मदत करणे.
३. ऑनलाईन पध्दतीने विद्यार्थ्यांनी भरलेले अर्ज कन्फर्म करण्यासाठी विद्यार्थी विभागाला मदत करणे व मुदतीत अर्ज कन्फर्म होतील याबाबत दक्ष रहाणे (दिनांक २/३/२०१० पर्यंत)
४. तंत्र शिक्षण संचालनालय, विभागीय कार्यालय यांचेशी वेळोवेळी संपर्क साधून त्यांनी केलेल्या मागणीनुसार सर्व पत्रव्यवहार करणे व योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी अंमलबजावणी करणे.

मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांनी बैठक घेऊन सदर योजना प्रभावीपणे राबविण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. तरी याबाबत योग्य ती कार्यवाही करण्याबाबत आपल्या अधिपत्याखाली **सर्व संस्थांना** निर्देश देण्यात यावे. याबाबतची अधिसूचना संकेतस्थळावर www.dte.org.in प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

( डॉ. सु. का. महाजन )
प्र.संचालक तंत्र शिक्षण
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत,

१. मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२
२. मा.प्रधान सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ३२